# अत्रे असताना-नसताना

**(पान ५ वरून)** प्रश्न विचारायला सुरुवात केली. एकानं विचारलं, 'का हो खांडेकर, अत्रे अन् फडके हे दोन दिग्गज एकमेकांचे वाभाडे काढताहेत. यात तुमची भूमिका काय?' माझ्या प्रकृतिधर्मानुसार या वादात मला पडायचं नसल्याने मी इतकंच म्हणालो, ''मी काय सांगणार? ते दोघेही थोर आहेत.''

''हे कुणीतरी अत्र्यांच्या कानावर घातलं असावं. अत्रेच ते! त्यांनी तेवढ्यात मला फटका मारलाच. पुढच्या 'नवयुग'च्या अंकात पहिल्या पानावर अत्र्यांचा लेख. लेखाचं शीर्षक काय? 'अत्रे-फडके थोर, मग खांडेकर काय पोर?' यावर मी काहीही प्रतिक्रिया दिली नाही.''

श्री.जं.नी विचारलं, ''अत्र्यांच्या स्वभावाबद्दल तुम्ही काय सांगाल?''

भाऊसाहेब म्हणाले, ''दोन प्रकारची माणसं असतात. दोन प्रवृत्ती समजा. एकजण असतो, तो कोणतीही कृती करण्यापूर्वी खूप विचार करतो. कधी कधी इतका, की तो कृती करतच नाही. दुसऱ्या प्रकारचा माणूस मनात येताक्षणी धाडकन् कृती करून मोकळा होतो, आणि मग त्याबद्दल विचार करायला लागतो. कधी कधी त्या अविचारी कृतीनं गोत्यातही पडतो. अत्र्यांची प्रवृत्ती दुसऱ्या प्रकारात मोडणारी होती. त्यामुळे ते अनेकदा गोत्यातही येत.''

नंतर जवळजवळ तीन-चार तास भाऊसाहेब अत्र्यांबद्दल अनेक कथा, दंतकथा, किस्से अन् कहाण्या सांगत राहिले.

'खरं म्हणजे अत्र्यांच्या विनोदावर प्रभाव होता तात्यासाहेबांचा- म्हणजे श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचा. पण अत्रे स्वतःला शिष्य म्हणवून घ्यायचे राम गणेश गडकऱ्यांचे. यात कोल्हटकरांचा ओसरता आणि गडकऱ्यांचा वाढता प्रभाव याचा जसा वाटा असेल, तसा अत्र्यांच्या कल्पनाशक्तीचाही भाग असणार...' असं मार्मिक विश्लेषण करणारी विधानंही भाऊसाहेबांनी केली.

संध्याकाळी सातच्या सुमारास आम्ही भाऊसाहेबांच्या घरातून बाहेर पडलो. परतताना श्री. ज. आणि मी अत्र्यांवरच बोलत होतो. श्री. ज. म्हणाले, ''काय विलक्षण प्रतिभावान माणूस होता हा! साहित्य, नाटक, चित्रपट, राजकारण, पत्रकारिता, शिक्षण क्षेत्र- ज्या ज्या ठिकाणी त्यांनी पाऊल टाकलं, तिथे तिथे आपली नाममुद्रा उमटवली. गेल्या अर्धशतकभर महाराष्ट्राचं साहित्यिक अन् सांस्कृतिक क्षेत्र अत्र्यांनी अक्षरशः व्यापून टाकलं होतं.''

भाऊसाहेबांचं बोलणं मनात घोळत असतानाच मला अत्र्यांबद्दल मंगेश पाडगावकरांशी झालेल्या आमच्या गप्पांची आठवण झाली. अत्र्यांचं साहित्य आणि वादळी आयुष्य याबद्दल बोलणं चालू असताना पाडगावकर म्हणाले होते, ''विनोदातून भल्याभल्यांची रेवडी उडवणारे अत्रे, घणाघाती अग्रलेखांमधून समोरच्याला जेरीला आणणारे अत्रे, हजारोंच्या सभा वक्तृत्वाने दणाणून टाकणारे अत्रे ही अत्र्यांची रूपं सगळ्यांनाच माहीत आहेत. पण अत्र्यांच्या एका विद्यार्थ्यानं त्यांचं एक हळवं, भावुक रूपही मला सांगितलं होतं. अत्रे या विद्यार्थ्याच्या वर्गाला मराठी शिकवायचे. एकदा कवितेचा तास होता. पावसात भिजलेल्या, कुडकुडणाऱ्या पाखरावरची कविता अत्रे शिकवत होते. ती कविता अत्र्यांनी इतकी तल्लीन होऊन शिकवली! करुणरसानं भरलेली ती कविता शिकवताना ते स्वतःही इतके भावुक झाले, की वर्गातल्या कितीतरी मुलांच्या डोळ्यांना झर लागली.

''मात्र, आयुष्यातल्या नंतरच्या उलाढालींमध्ये अत्रे बदलत गेले. आपल्या तोंडून बाहेर पडणाऱ्या शब्दांच्या सामर्थ्यावर हजारोंचा जनसमुदाय आपण झुलवू शकतो याचा साक्षात्कार झाल्यावर तर त्यांनी आपल्या अवघ्या शरीरालाच माईक बनवून टाकलं. या माईकमधून उमटणारा ध्वनी जसजसा वाढत गेला; तसतसा त्या भावुक अत्र्यांचा आवाज क्षीण होत गेला. एक प्रचंड अवाढव्य सार्वजनिक व्यक्तिमत्व लाभलेल्या 'विश्वरूप' आचार्य अत्र्यांपुढे ते हळवे, 'सुकुमार' अत्रे अधिकाधिक अंग चोरत गेले.''

आज जेव्हा जेव्हा अत्र्यांची आठवण येते, तेव्हा पाडगावकरांचे हे शब्द माझा पाठलाग करतात.

rajhansprakashansales@gmail.com

